डॉ. विनोद पाटील
प्रभारी कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

कुलसचिवांचे कार्यालय,
महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई – ४०० ०३२
ईमेल : registrar@fort.mu.ac.in

## परिपत्रक

**(अत्यंत महत्वाचे)**

No. REG/ICC/2020-21-15

**विषय** : महाराष्ट्र राज्यात Mission Begin Again या अंतर्गत मर्यादीत उपस्थीतच्या काळात विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व प्रशासकिय कार्यालयातील शिक्षकेत्तर अधिकारी /कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत.

**संदर्भ** : १. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीआयएसएम—१, दिनांक ३१ मे, २०२०

२. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन,क्र. डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीआयएसएम—१, दिनांक ४ जून, २०२०

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:समय-२०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका) दिनांक ४ मे, २०२०

४. महाराष्ट शासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण १०२०२०/प्र.क्र.०१/सचिव (व्यय), दिनांक ५ जुन, २०२०

५. महाराष्ट शासन प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. समय२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.वका), दिनांक ५ जुन, २०२०

६. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल, यांचे पत्र क्र. विससं/उशि/काविप/मशि—१/२०२०/६४५, दिनांक ६ जुन, २०२०

७. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु—२०२०/सीआर-९२/डीआयएसएम—१, दिनांक २९ जुलै, २०२०.

८. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु—२०२०/सीआर-९२/डीआयएसएम—१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०.

९. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु/२०२०/सीआर-९२/डीआयएसएम—१, दिनांक ३० सप्टेंबर, २०२०.

१०. विद्यापीठाचे परिपत्रक क्र REG/ICC/2020-21-08, दिनांक ०२ सप्टेंबर, २०२०

११. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दिनांक २१ सप्टेंबर, २०२० उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

कोव्हिड—१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या लॉकडाऊन काळात विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व प्रशासकिय कार्यालयातील शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयातील मर्यादीत उपस्थिती व कार्यालयीन कामकाजाबाबत विद्यापीठाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त सुचनांनुसार परीपत्रके / आदेश निर्गमित केलेले आहेत.

उपरोक्त संदर्भाधीन क्र. ९ नुसार Mission Begin Again अंतर्गत कोव्हिड—१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या टाळेबंदी (लॉकडाऊन) काळात विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व प्रशासकिय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची कार्यालयीन उपस्थिती मर्यादीत ठेवण्याबाबत शासनाकडून सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत तसेच दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२० पर्यंत टाळेबंदी जाहिर करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ११ नुसार परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी निगडीत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि, सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्या प्रमाणे आवश्कतेनुसार लागू राहिल. परीक्षा व परीक्षेशी संबधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून परीक्षा कामकाजासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसंदर्भात संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांनी आपल्या स्तरावर आवश्यकतेनुसार योग्त ती कार्यवाही करावी.

वरील संदर्भीय शासन आदेश क्र ८ मधील ४ (iii) (a) नुसार विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील व प्रशासकिय कार्यालयातील वर्ग १ व वर्ग २ संवर्गातील अधिका—यांची १००% उपस्थीती अनिवार्य केलेली आहे तसेच ४ (iii) (b) a. नुसार वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील शिक्षकेत्तर कर्मचा—यांची ३०% किंवा किमान ३० कर्मचारी यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे आळीपाळीने कार्यालयीन उपस्थिती अनिवार्य केलेली आहे. तसेच ज्या कर्मचा—यांना कार्यालयात उपस्थितीत राहण्यापासून सुट मिळेल त्यांनी घरी राहून (Work From Home) या संकल्पनेद्वारे कार्यालयीन कामकाज करावे व जे कर्मचारी रजेवर आहे त्यांचा यात समावेश करु नये.

संदर्भांकित क्रमांक तीन (०३) नमुद केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयातील दोन (अ) नुसार कार्यालयीन उपस्थिती निश्चित करण्यासाठी सर्व संबंधित विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी/उपकुलसचिव यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी. विद्यापीठातील प्रशासकिय व शैक्षणिक विभागातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचारी यांची विभागातील एकुण संख्येच्या ३०% किंवा कमीत कमी ३० कर्मचारी, हया पैकी जी जास्त असेल, त्या संख्येच्या प्रमाणात कर्मचा—यांच्या उपस्थितीच्या संदर्भात (अत्यावश्यक सेवा पुरविणारे विभागां व्यतिरीक्त) प्रशासकिय कामकाजाच्या सुसत्रतेसाठी कामकाजाचा आराखडा तयार करुन उपकुलसचिव, आस्थापना विभाग, यांना कर्मचा—यांच्या उपस्थितीबाबत कळविण्यात यावे.

संदर्भ क्र ४ व ६ नुसार मर्यादीत उपस्थितीच्या काळात कार्यालयातील कर्मचा—यांच्या उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत शासनाकडून सुचना करण्यात आल्या आहेत त्यानुसार शैक्षणिक विभाग व प्रशासकिय विभागातील वर्ग १ व वर्ग २ संवर्गातील अधिकारी हे कार्यालयात १००% उपस्थीत राहतील व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत कार्यालयीन कामकाजाच्या सोईनुसार आठवडयातून किमान २ दिवस कर्मचारी कार्यालयात हजर राहतील या दृष्टीने रोस्टर तयार करुन (अत्यावश्यक सेवा पुरविणारे विभागां व्यतिरीक्त) उपस्थिती बाबत कार्यवाही करण्यात यावी यात गर्भवती महिला व दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना यातून सुट देण्यात यावी तसेच कार्यालयात उपस्थीत असलेल्या कर्मचा—यांची हजर असलेल्या दिवसाच्या कामाची नोंद ठेवावी व संबधितांच्या उपस्थितीबाबातचा अहवाल खाली नमुद केलेल्या तक्त्या नुसार आस्थापना विभागास सादर करावा व परिपत्रकातील इतर बाबींबाबत सुध्दा आपल्या अधिनस्त शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना अवगत करावे.

| विभाग/कार्यालयाचे नाव : | | एकुण शिक्षक /अधिकारी/कर्मचारी संख्या : | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांचा सांकेतांक | शिक्षक/ अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | पदनाम | उपस्थिती दिनांक |
| | | | | |

प्रतिबंधित क्षेत्रात (Containment zone) रहिवास असणा—या शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात कामकाजाकरीता बोलवू नये तसेच त्यांना घरी राहून (Work from Home) काम करण्याबाबत सुचना दयाव्या मात्र अश्या शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांनी सोबत जोडलेल्या प्र—पत्रात आवश्यक त्या कागदपत्रांसह माहिती भरुन विभाग प्रमुखांस सादर करावी व विभाग प्रमुख यांनी याबाबतची शहनिशा करुन हजेरीपत्रकात याबाबतची नोंद करुन सदर माहिती अस्थापना विभागास सादर करावी.

शिक्षक /अधिकारी/ कर्मचारी यांनी विभागात/कार्यालयात उपस्थिती दरम्यान आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या कोव्हीड -१९ च्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय मार्गदर्शक सूचना तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यासाठी सामान्य प्रशासन विभाग, फोर्ट/कलिना व उप—परिसरे यांनी आवश्यक त्या उपया योजना कराव्यात.

**ठिकाण : मुंबई -४०००३२** **(डॉ. विनोद पाटील)**

**दिनांक : ०४ ऑक्टोंबर, २०२०** **प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१ विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक, सर्व प्रभारी संचालक, वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, आदर्श महाविद्यालये, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहाय्यक कुलसचिव, सुरक्षा अधिकारी.

२ स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र—कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ ५) वित्त व लेखा अधिकारी.

# प्र—पत्र

## प्रतिबंधित क्षेत्रात रहिवास असल्याबाबतचे घोषणापत्र

**अधिकारी/कर्मचारी यांचे नाव** : ..........................................................................

**कर्मचारी सांकेतांक क्रमांक** :................................................................................

**पदनाम** :...............................................................................

**विभाग** :................................................................................

**निवासाचा पत्ता** :................................................................................

................................................................................

................................................................................

मी नमुद करतो की, वर नमुद केलेल्या पत्त्यावर मी राहत असून मुंबई महानगरपालिका / एम.एम. आर. कार्यक्षेत्रातील महानगरपलिका/तत्सम प्राधिकरणे यांनी दिनांक..................रोजी घोषित केलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात (Containment Zone) माझ्या रहिवास क्षेत्रात आज रोजी समावेश आहे.

सदर बाब विचारात घेऊन परीपत्रक क्रमांक REG/ICC/2020-21-15 अन्वेय मला कार्यालयात उपस्थिती राहण्यापासून सूट मिळावी ही विनंती उपरोक्त प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) हटविण्यात आल्यास त्याबाबत विद्यापीठास तात्काळ कळविण्याची जबबादारी माझाी राहिल.

दिनांक : स्वाक्षरी :

शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांचे नाव: